# पारंब्या!

वाढते जेंव्हा वृक्षावर
आधार घेणारी वेल
तेव्हा लोंबकळतात
प्रेमाच्या पारंब्या
गुंफीत प्रणयाचे पाश
रात्रभर चंद्राला वाटते
त्यालाच अर्पिली ती माळ
पण प्रेम असते खेळत
त्याच्याशी लपंडाव
तुझ्यामाझ्या मिठीत
जातो सरून काळ
संध्या ते सकाळ
हलत राहाते गुलाबी उर्मीत
वृक्षवेली पान
अन् पान
खेळते अंगभर वारे
उधळीत अस्मानी तारे
सांचवीत राहाते धुकं
अंतर्यामी सूख---अंधुक

विजय पाठारे